# स्त्री - भृण हत्या :- एक सामाजिक दु:स्वप्न

**ए.ए. नांदगावकर**
मराठी विभाग
स्वा.से.श्री.क.रा. ईन्नाणी महाविद्यालय, कारंजा (लाड),जि. वाशिम

## सारांश

*आज भारतात स्त्रीयांची संख्या कमी होत आहे.आज नाहीतर उद्या या विचाराचा अत्यंत गंभीरतेने विचार आपणा सर्वांनाच करावा लागणार आहे. या विचाराची सुरवात होण्यास जो विलंब झाला यातूनच आज समाजातले वाईट परिणाम आपणास दिसत आहे. याचा परीणाम भविश्यात आपल्या दिसेलच आपण जे जागरुत झाले आहे, ही जागरुकता टिकवूण ठेवणे आपलेच काम आहे. परिणामांचा विचार न करता आपण आज परत जुन्याच विचारांकडे वळत आहो का ? याचा विचार करणे गरजेचे व कालोचित आहे. आज या दृष्टीने विचार करुण ठोस निर्णयापर्यंत पोहोचणे गरजेचे ठरते. व हे कार्य समाज व देशाहिताचे ठरल्या शिवाय राहणार नाही. स्त्रीभृणहत्या हा विषय अत्यंत गंभीर विषय आहे, हे जरी आज सर्वांनी माण्य केले असले तरी उपाययोजना काय यावर मात्र फारसा विचार होत नाही. म्हणूनच गंभिरता व परिस्थितीनुरुप उपाययोजनांचाही विचार प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न सदर शोधछात्र करणार आहे.*

**मुख्यशब्द:** *स्त्री - भृण, समाज, व्यक्ती, भारत, वैचारिकता*

## प्रस्तावना

फार पूर्वी भारतामध्ये मातृसत्ताक पध्दती होती. या मध्ये मामकुळ व स्त्री - वर्चस्व या सर्वांचा प्रभाव होता. पुढे पुरुषी अहं वाढीस लागल्यामुळे स्त्री स्वातंत्र्य संपुष्टात आणल्या गेले व स्त्रीवरील अन्याय अत्याचारांचे प्रमाणही वाढत गेले मात्र स्त्रीने या अन्याया विरुध्द बंड करु नये म्हणुन तीला विविध प्रेमळ उपमा दिल्या. तिला मोठेपण दिले. सर्वत्र तीचा जयजयकार केला. परिणामी या स्तुतीने तीचा विरोध मावळला आणि ती त्यागाच्या कल्पनेत आकंठ बुडाली. मग ती हळूहळू या समाज प्रवाहाच्या बाहेर फेकली गेली अन् पुरुष केव्हा वर्चस्वाचे जागेवर जावून बसला हे तिलाही कळाले नाही. कळाले तेव्हा वेळ निघुन गेली होती. आज तीला जाग आली आहे. पण स्ववर्चस्व सिध्द करण्यसाकरीता आज तीला प्राणांतिक लढा देणे अत्यंत गरजेचे झाले आहे हे सुध्दा तेवढेच निश्चित आहे. अस म्हणावे लागेल.

मात्र काही ठिकाणी ती ऐकणार नाही हे लक्षात येताच तीला धर्मेकल्पनेचा आधार घेवून हिन दिन ठरवले - तिला मोक्ष नाकारल्या व तीचे मानसिक खच्चीकरण करुन तीचा अहं संपवीला परिणामी तीचा विरोध संपूर्णपणे संपूष्टात आला.मात्र या लढयाची सुरवात करताच तीचे समोर काही समस्या उभ्या राहिल्या आहेत. या पैकी भिषण समस्या आहे ती स्त्रीभृणहत्येची. आज देशामधे ही समस्या गंभीर रुप धारण करीत असलेले आपणास दिसून येईल. या समस्येचे भिषणरुप समोर येताच प्रत्येकच व्यक्ती हादरुन गेली आहे. करण हे जे सत्य समोर येत आहे ते अत्यंत भयावह आहे. म्हणूनच या समस्येचा विचार प्रस्तूत शोधनिबंधात करण्यात माणस आहे.

## पुर्वेतिहास स्त्री अन्यायायाचा

पूर्वी भारतामधे बहुपत्नीत्वाची पध्दत अस्तित्वात होती. या पध्दतीमागे काही कारणे होती. पुर्वी रोगराई यायची ती साथीच्या रुपाने. या मध्ये हजारोलाखो लोक मृत्युमुखी पडत असत. स्त्रीदेह काटक असल्याने ती ह्यातून वाचायची. पण मग त्या स्त्रीला विवाहायोग्य पुरुष भेटणे अवघड असल्यामुळे बहूपत्नीत्वात बांधल्या जायची. तसेच लढाईकरीता सैन्यात पुरुष भरती व्हायचे बरेचदा युध्दात पुर्ण युवापीढीच कापली जायची. मग स्त्रीयांचे विवाहाचा प्रश्न समोर आल्यावर तीला बहूपत्नीत्व स्विकारवेच लागत असे. यातुनच आवडती - नावडती प्रकार निर्माण झाले. पुढे पुढे स्त्रीयांना दुय्यम स्थान दिल्या जावून नंतर तीला उपभोग्य वस्तूच समजले गेले यामुळे स्त्री थोडीही चुकली तर तीला दंड देण्याऐवजी प्राणदंड दिला जावू लागला. म्हणजेच स्त्रीला वस्तुप्रमाणेच माणले व वापरले जावू लागले.

यातुनच समाजाची मानसिकता मुलगी नको ची होत जावून स्त्री जन्माचा आनंद हळूहळू संपुष्टात आला. मुलगी म्हणजे त्रास,नरकाचे द्वार वगैरे उपाध्या दिल्या जावून तिचा छळ सासरी माहेरी होवू लागला, परिणामी तीच्या दुर्देवाचे फेरे सुरु झाले ते न संपण्याकरीताच या मानसिकतेमधून मुलगी जन्मास येताबरोबर तिच्या मृत्युचा विचार केला जात असे तीच्या गळ्याला नख लावले जात असे किंवा इतर उपयांनी तीला संपवीण्याचा प्रयत्न प्रत्यक्ष तिचे नातेवाईक करायचे. पण हे जन्मास आल्यावर घडत असल्यामूळे बरेचदा मातृ-पितृप्रेम ऊफाळून आल्याने हा छोटा जीव वाचत असे.हळूहळू विज्ञानाने प्रगती केली. या प्रगतीचा परिणम असा झाला की गर्भातीला जीव स्त्री की पुरुष हे बघणे सहज शक्य झाले आणि यातुन स्त्री छळाची एकनवी मालिकाच परत एकदा समाजसमोर येणे सूरु झाले.

## *जाणीव*

स्त्री भृण हत्येची जाणीव ही आत्ता होवू लागली आहे. कारण समाजाचे चक्र हे स्त्री व पुरुष या दोन पायांवर सुरु असते. आजच्या परिस्थितीमध्ये मात्र स्त्री कनखर नसल्याचे लक्षात यायला लागले. घरात मुलगी नको असे विचार वाढीस लागल्याचे लक्षात यायला लागले. स्त्री वर होणाऱ्या अन्याय अत्याचारात वाढ झाल्याचे दिसून आले. हे सरकारी आकडयांनी सिध्द झाले. छळ,हत्या, बलात्कार आदी समवेत आणखी एका न नोंदवल्या जाणाऱ्या गुन्हयाची जाण समाजास झाली. ही जाण होती स्त्रीभृण हत्येचे वाढत्या प्रमाणाची. ही जाणीव होताच संपूर्ण समाजमन हादरले आणि मग याचे चिंतन व चिंता सुरु झाल्या. आज या चिंतेने उग्ररुप धारण केले आहे.

## *लोकसंख्या प्रमाण*

**भारतात लोकसंख्या मोजणी सुरु झाली तेव्हा स्त्रीयांचे प्रमाण दर हजारी ९७० एवढे होते. म्हणजे सुमारे ३० स्त्रीया ह्या हजारा मागे कमी होत्या. हे प्रमाण सर्वोच्च होते असेम्हणावे लागेल कारण नंतरच्या एकाही जणगणनेत हे प्रमाण ही लोकसंख्या कधीही गाठू शकले नाही. आजच्या परिस्थितीत हे प्रमाण ९४० एवढे खाली घसरले आहे. याचाच अर्थ स्त्रीयांचे वर होणाऱ्या अन्याया मध्ये वाढ झाली आहे असे आपणास म्हणावे लागेल.**

## स्त्रीभृणहत्येची कारणे

**१) आधी समाजात वंशवेलीचे महत्व मानले जाते. कुलदिपक, नाव पुढे चालवणरा मुलगाच अशा या समाजतून स्त्रीभृण हत्या घडते.**

**२) मुलगी नको या भूमिकेतूनही स्त्रीभृण हत्या घडते.**

**३) आधूनिक वैद्यकशास्त्राने गर्भलिंग निदान सुरु केले अन् मुलगाच हवा चा हव्यास वाढला.**

**४) गैरसमज आणि अज्ञानातून स्त्रीभृण हत्या वाढतच आहे.**

**५) डॉक्टरांनी पैसा कमावण्याकरीता एक वाईट प्रथा व असोग्य सल्ला देण्याची वृत्ती स्विकारली.**

**अश्याप्रकारची अनेक कारणे आज स्त्री भृणहत्येमागे देता येवू शकतात या कारणपरंपरेत आणखी कारणे देवून समाजामध्ये आज स्त्रीभृणहत्या सूरु आहे. समाजामध्ये आज स्त्रीला कितीही उच्चस्थान दिले जात असल्याचा आव आनला जात असला तरी आज तीची स्थिती मात्र अत्यंत दयनिय असल्याचे आज आपल्या निदर्शनास आल्याशिवाय राहणार नाही हे अगदी निश्चित आहे.**

## *स्त्रीभृणहत्या टाळण्यास उपाय योजना*

**आज समाजामध्ये स्त्रीयांबाबतची जी उदासिनता दिसून येते ती दुर करण्याकरीता प्रयात्न होणे अधिक गरजेचे आहे. कारण आपण जर ही उदासिनता दूर केली तरच बरेचसे प्रश्न आपोआप सूटतील. आज स्त्रीयांचे प्रमान पुरुषांचे तुलनेत कमी झालेले आहे. जर हे प्रमाण वाढले नाही तर. बलात्कार, स्त्री अत्याचार, ईत्यादी गुन्हयात वाढ झाल्याशिवाय राहणार नाही.**

**स्त्री समानाता सांगतांना स्त्रीयांना समानतेची वागणूक देण्याबाबतचा विचार समाजाने माण्य केला पाहिजे. जर असे झाले तरच स्त्री विषयक जागृती यशस्वी झाली असे म्हणता येईल. आज समाजाध्ये स्त्रीयांना फक्त कागदोपत्रीच अधिकार प्राप्त झाले आहेत. प्रत्यक्षात मात्र कसलेही अधिकार मिळालेले नाहीत. मग अश्या स्थितीत त्यांना सुरक्षीत वाटतटी नाही. व त्यांच्या अधिकाराची जाण त्यांना होत नाही. म्हणून प्रथम त्यांची जागृती होणे अत्यावश्यक आहे.**

**डॉक्टर मंडळींनी स्त्रीभृणहत्येचे पाप करुच नये. त्यांनी गर्भलिंगनिदान चाचण्या टाळल्या पाहिजे. त्यांनी स्वत: त्या परिवारास समजावून सांगणे शक्य होत नसेल तर पोलीस किंवा इतर तत्सम मंडळीची मदत घेवून त्या परिवारास या चुकांपासून परावत्त केले पाहीजे.** सरकारणे आज मुलींकरीता ज्या योजना, जसे मोफत प्रवास, शिक्षण, शिश्यवृत्ती इत्यादी सुरु केल्याआहेत त्या प्रभावीपणे राबवल्या पाहिजे. जेणेकरुण त्याचा सुयोग्य परिणाम आज समाजावर होवून समाजात स्त्रीला मानाचे स्थान पुणश्च एकदा प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही.

## समारोप

आज समाजास्थितीचा विचार केला तर स्त्रीभृण हत्येचे प्रमान फार वाढलेले आहे. अश्या स्थितीत समाजजागृती होणे व त्यावर उपाय योजना करणेही अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा पर्यावरण व समाजमनाचा सभतोल व संतूलन बिघडल्याशिवाय राहणार नाही हे आपण निश्चितच माण्य केले पाहिजे.

## निष्कर्ष

१) आज स्त्री भृण हत्या रोखणे अत्यंत गरजेचे आहे.
२) समाजमनाची जागृती होणे काळाची गरज आहे.
३) स्त्रीला पुनश्च मातृदेवतेची जागा द्यावीच लागेल.
४) समाजात स्त्रीयांचे अधिकाराची जाणीव तिव्रतेणे करुण द्यावी लागेल.
५) सरकार स्थरावर स्त्रीअधिकारांची जाणीव जागृत ठेवून त्यांचे अधिकारात योग्य वाढ करुण देणे आपले अद्य कर्तव्य ठरेल.
६) विविध सामाजिक कार्यक्रमांद्वारे हे सर्व करणे सहज शक्य ठरु शकेल.

## संदर्भ

**पारशेट्टी, शो. (२०११).** जळत्या वेदना कहर कन्या भृणहत्येचा मुक्तरंग प्रकाशन लातूर.

**जोशी, प्रा. (२००७).** मुलगी नकोशी होते तेव्हा स्त्री भृण हत्या सामाजिक कलंक.

**ठोंबरे, रे. (२००७).** लेख महाराष्ट्र आरोग्य पत्रिका.